# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१६०/२०१० मधील निशाणी क्र.१२५ वर आदेश

**CNRNO.MHLA110006952010.**

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलाचा युक्तीवाद ऐकला.

२. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.६ व ७ ची साक्ष घेण्यास परवानगी देण्याकरिता केलेला आहे. सदर अर्जास वादींनी म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी कैफियतीद्वारे वादींची मागणी मान्य केलेली असल्यामुळे सदर प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी कैफियतीद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या कैफियतीमधील कथनाविरुद्ध कथन केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे कथन व प्रतिवादी क्र.६ व ७ यांचे कथन व बचाव एकमेकांविरुद्ध आहेत. तसेच सदर प्रतिवादी क्र.६ व ७ यांना स्वतंत्ररीत्या पुरावा दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ व ७ यांना प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे साक्षीदार म्हणुन साक्ष नोंदविता येत नाही. सदर अर्जाला प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी म्हणणे दिलेले नसल्यामुळे सदर अर्ज प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणातील दाव्यामधील व कैफीयतीमधील कथनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी मिळकतींच्या वाटपाकरिता दाखल केलेला असुन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कैफियतद्वारे वादी व

मयत दिनकर यांच्यामधील नातेसंबंध नाकारलेले आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.४० ला मुद्दे काढण्यात आलेले असुन सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादी हे मयत दिनकरराव बिरादार यांचे वारस आहेत अथवा प्रतिवादी क्र.१ ते ३ हे मयत दिनकरराव बिरादार यांचे वारस आहेत, याबाबत महत्त्वाचा वाद आहे. तसेच प्रकरणातील वादी क्र.१ ही मयत दिनकरराव यांची कायदेशीर पत्नी आहे अथवा प्रतिवादी क्र.१ ही मयत दिनकरराव यांची कायदेशीर पत्नी आहे, याबाबत महत्त्वाचा वाद आहे.

४. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे विद्वान वकिलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.६ व ७ यांचा पुरावा प्रकरणात आल्यास पक्षकारांमधील वादाचा कायमस्वरुपी निराकरण होण्यास मदत होणार आहे. सदर प्रतिवादी क्र.६ व ७ हे प्रकरणामध्ये स्वतःहुन पुराव्यासाठी हजर राहण्याची शक्यता नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींना प्रतिवादी क्र.६ व ७ यांची साक्ष नोंदविण्यास परवानगी देण्याची मागणी केलेली आहे. सदर युक्तीवादाच्या पृष्ठर्थ प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी खाली नमुद न्यायनिर्णय दाखल केलेला आहे.

*M/s. Ravalnath Builders Vs. Ms. Sebastiano Escolastica Beatriz Nunes Mendonsa @ Beatriz Mendonca, 2012 (7) All M R 162*

५. याउलट सदर प्रकरणातील वादींतर्फे विद्वान वकिलांनी युक्तीवादाच्या पृष्ठर्थ खाली नमुद न्यायनिर्णय दाखल केलेले आहेत.

1. Suresh Sahebrao Tawale Vs. Uttam shankar Ghadge & Ors.

2. Ramdas Dhondibhu Pokharkar Vs. State bank of India 2003 (1) All M R 76.

६. सदर प्रकरणातील प्रतिवादींतर्फे दाखल वर नमुद न्यायनिर्णयामधील निष्कर्षाविरुन स्पष्ट होते की, विरुद्ध पक्षकाराला साक्षीदार म्हणुन तपासता येते. सदर प्रतिवादींतर्फे दाखल न्यायनिर्णय सन २०११ मधील असुन वादींतर्फे दाखल वर नमुद अ.क्र.२ वरील न्यायनिर्णय हे सन २००२ मधील असुन सदर न्यायनिर्णयाचा उहापोह वादींतर्फे दाखल न्यायनिर्णयामध्ये करण्यात आलेला आहे. तसेच वादींतर्फे दाखल अ.क्र.२ वरील न्यायनिर्णयामधील हकिकत व प्रस्तुत प्रकरणातील हकिकत भिन्न आहे. तसेच सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये महत्त्वाचा वाद मयत दिनकररावचा पहिला विवाह कोणासोबत झालेला होता, व मयत दिनकररावचे कोण वारस आहेत, याबाबत आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.६ व ७ हे मयत दिनकररावांच्या बहिणी आहेत. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी नि.क्र.१०३ ला कैफियत दाखल करुन दाव्यातील मागणी मान्य व कबुल केलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या कैफियतीमधील कथन हे प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे दाखल कैफियतीच्या विरुद्ध कथन आहे.

७. त्यामुळे सदर प्रकरणात प्रतिवादींतर्फे दाखल वर नमुद

न्यायनिर्णयामधील निष्कर्षावरुन स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.१ ते ३ ला विरुद्ध पक्षकारांची साक्ष नोंदविता येते. त्यामुळे सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.६ व ७ यांची साक्ष नोंदविण्यासाठी परवानगी दिल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नसुन खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार आहे. तसेच प्रतिवादी क्र.६ व ७ हे साक्षीसाठी प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे साक्षीदार म्हणुन हजर झाल्यानंतर वादींना त्या साक्षीदारांची उलटतपाणी घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना प्रतिवादी क्र.६ व ७ यांची साक्ष नोंदविण्यास परवानगी दिल्याने वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.१२५ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क.१ ते ३ यांना प्रतिवादी क्र.६ व ७ यांची साक्ष नोंदविण्यास परवानगी देण्यात येत आहे.

स्वा/-

दि. १८.१०.२०१९. (शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 18.10.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 18.10.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 24.10.2019 |